जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2025
तरुण भारत

# नाईट कॉलेज इचलकरंजी - एमजीएम कराड यांची विजेतपदासाठी लढत



इचलकरंजी : खो-खो सामन्यातील एक क्षण.

प्रतिनिधी
इचलकरंजी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत इंटर झोनल महिला खो-खो स्पर्धेत नाईट कॉलेज, इचलकरंजी आणि एसजीएम कॉलेज, कराड यांनी अंतिम फेरीत मजल मारत विजेतपदाची लढत रंगवली आहे. उपांत्य फेरीत दोन्ही संघांनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांना नमवले.

पहिल्या उपांत्य सामन्यात यजमान नाईट कॉलेज, इचलकरंजीने एमजी कन्या महाविद्यालय, सांगलीचा १ डाव ७ गुणांनी पराभव करून फायनलमध्ये प्रवेश मिळवला. नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत सामन्यावर नियंत्रण मिळवले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात एसजीएम कॉलेज, कराड आणि शिवराज कॉलेज, गडहिंग्लज यांच्यात सामना अत्यंत चुरशीचा झाला. दुसऱ्या डावात कराड संघाने फक्त ७ मिनिटे ३० सेकंदांत प्रतिस्पर्धी संघातील पाच खेळाडूंना बाद करत विजय निश्चित केला.

मंगळवारी सकाळच्या सत्रात तृतीय क्रमांकासाठी एमजी कन्या, सांगली व शिवराज गडहिंग्लज यांच्यात सामना होणार आहे. त्यानंतर अंतिम फेरीत नाईट कॉलेज, इचलकरंजी आणि एसजीएम कराड यांच्यात विजेतपदासाठी संघर्ष रंगणार आहे.

पुरुष गटाची खो-खो स्पर्धा मंगळवार, २८ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. उद्घाटन रोटरी क्लबचे पदाधिकारी व देशभक्त बाबासाहेब भा. खंजिरे शिक्षण संस्थेचे विश्वस्त राहुल खंजिरे यांच्या हस्ते होईल. बक्षीस वितरण समारंभ बुधवार, २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सात वाजता होणार असून विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे आणि इतर मान्यवर उपस्थित राहतील. ही स्पर्धा दिवस-रात्र अशा दोन सत्रांत विद्युतझोतात पार पडणार असून क्रीडाप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. विरुपाक्ष खानाज यांनी केले आहे.